**CNR No :- MHSI100001522019**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६/२०१९ :–

## –: निशाणी ९६ वरील आदेश :–

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ व २ च्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ यांची मुंबई येथे बदली झाल्याकारणे आवश्यक कागदपत्रे व माहिती ते उपलब्ध करुन देऊ शकले नाही. तसेच प्रतिवादी क्र. २ हे नव्याने सरपंच म्हणुन निवडून आल्या कारणाने त्यांचे कडुन देखील आवश्यक माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुद्ध ''उलटतपास नाही''चा आदेश पारीत केला. सदर कृत्यामागे त्यांचा कोणताही गैरहेतु नव्हता. सदरचा आदेश रद्दबातल न झाल्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. सबब, सदरचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी प्रस्तुत अर्जाकामी नि.क्र.९७ वर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूरीस आक्षेप

नोंदविला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, दाव्यास विलंब व्हावा या उद्देशाने प्रस्तुत अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रतिवादी क्र. १ व २ यांना साक्षीदाराचा उलटतपास घेणेस पुरेशी संधी उपलब्ध करुन देऊनही उलटतपास न घेतल्यामुळे त्यांच्या विरुद्ध 'उलटतपास नाही'चा आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादीने केलेल्या सदर कृत्यामुळे न्यायालयाचा व परीणामी वादी यांचा अमुल्य वेळ वाया गेलेला आहे. प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. परंतु, अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालवावी लागतील. तसेच सदरची बाब नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारी नाही. प्रतिवादीने केलेल्या कृत्याचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन होणारे आहे. त्यामुळे खर्चाचे आदेश पारीत करुन वादींचा अर्ज मंजूर करणे उचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे पारीत करणेत येत आहे :-

**-:: <u>आदेश</u> ::-**

१. रक्कम रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) खर्चाचे आदेश करुन अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) वादीतर्फे साक्षीदार क्र. १ दत्तगुरु अर्जुन गवस यांस आदा केल्यावर, प्रतिवादी क्र. १ व २ विरुद्ध पारीत झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.08.06 16:56:09 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – ०६.०८.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.